मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सुविधा द्या अन् कर घ्या, नागरिकांची मागणी

## मोरेवस्ती, साने चौक परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या संतप्त प्रतिक्रिया...

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** रस्ते, पाणी, ड्रेनेज, कचरा अशा मुलभूत सुविधा आम्हाला मिळाल्याच पाहिजे. या सेवासुविधांसाठीच आम्ही कर भरतो, मग सुविधाही मिळायलाच हव्या अशा संतप्त प्रतिक्रिया मोरेवस्ती, साने चौक परिसरातील नागरिकांनी व्यक्त केल्या.

चिखली परिसरातील मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, साने चौक या ठिकाणी अरूंद रस्ते, पाण्याची समस्या, ड्रेनेज च्या समस्यांचा सामना नागरिकांना नेहमीच करावा लागतो. महापालिका सर्वांकडून टॅक्स घेते मग सुविधाही दिल्या पाहिजे असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जाते आहे.आहेत. मागील २८ पेक्षा जास्त वर्षे फोटोग्राफी क्षेत्रात कामकाज, पिंपरी चिंचवड महानगपालिका आस्थापनेवरील प्रसिद्धी विभागासाठी २० वर्षे काम केले आहे.आजवर महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर अनेक विषयावर फोटोग्राफी प्रदर्शने आयोजित केली आहे. फोटोग्राफी प्रदर्शने आयोजित केली आहे. सध्या डॉक्यूमेण्ट्री, फिल्म मेकिंग प्रकारात कार्यरत आहेत. अनेक नामवंत वृत्तसंस्था, नामांकित चॅनल साठी फोटो जर्नलिस्ट म्हणून काम करत आहेत. अतुल्य भारत या विषयावर पूर्ण भारताचे सांस्कृतिक चित्रीकरण करण्याचा त्यांचा प्रकल्प सुरू आहे.



"साने चौक ते मोरे वस्ती, टॉवरलाईन, म्हेत्रेवस्ती या सर्व ठिकाणी ड्रेनेजलाईनची मोठी समस्या आहे. जुन्या ड्रेनेजलाईन सातत्याने तुंबल्या जातात. अजून नवीन लाईन टाकल्या जात नाहीत. रस्त्यावर खड्डे पडल्यास तत्काळ बुजविले जात नाहीत. मात्र राजकीय नेत्यांचा दौरा असेल तेव्हा तत्काळ रस्त्यांची डागडुजी, स्वच्छता केली जाते. लाईट, पाणी, रस्ते, ड्रेनेज, स्वच्छता या मुलभूत सुविधा आहेत. महापालिका टॅक्स घेते मग सुविधाही द्यायला पाहिजेत.

–यश साने राष्ट्रवादीचे युवा नेते



"मागील ४० ते ४५ वर्षापासून राजा शिवछत्रपती हौसिंग सोसायटी हनुमान नगर ताम्हाणे वस्तीमध्ये स्थायिक आहे. चिखली गाव महापालिकेत वर्ग झाले तेव्हापासून नियमित कर भरतो. मागील दीड वर्षापासून ड्रेनेज लाईन तुंबल्याचे प्रमाण वाढले आहे. सोसायटीतील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.ड्रेनेजचे चेंबर अतिशय निकृष्ट दर्जाचे बनवले जाते. चेंबर तुंबल्यानंतर त्या ठिकाणी रहाणे असाह्य होते.

– संजय शिंदे नागरिक



"विकासकामे करायचे म्हटले की, परिसर रेडझोन असल्याचे कारण सांगितले जाते. रस्ते विकसित करू शकतात. ड्रेनेजच्या समस्या दूर करू शकतात. सर्वात जास्त त्रास हा ड्रेनेज लाईनचा आहे. पाण्याची समस्याही तीव्र आहे. महापालिका परिसरातील प्रत्येक सदनिकाधारकांडून टॅक्स घेते मग सुविधाही द्यायलाच पाहिजेत.

–मनोज जरे, सामाजिक कार्यकर्ते

"महापालिका न चुकवता टॅक्स घेते. तसेच न मागता सुविधाही दिल्या पाहिजेत. पाण्याची समस्या परिसरातील सोसायट्यांना येते आहे. त्यावरही तोडगा काढला पाहिजे. कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात या परिसरात वास्तव्यास आहे. त्यांच्या हिताचे निर्णय महापालिकेने घेतले पाहिजेत.


–विजय पाल नागरिक

# जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बुधवारी भव्य रॅलीचे आयोजन

## बुधवारी सकल मराठा समाजाकडून महाराष्ट्र बंदची हाक

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांच्या साठी मनोज जरांगे पाटील विविध आंदोलने करत आहेत. जानेवारीत आपल्या लाखो सहकाऱ्यांसह जरांगे पाटील मुंबईत धडकले. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारच्या वतीने जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या. त्यांच्या हस्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले व आंदोलन स्थगित केले.

सगेसोयरे यांना जात दाखले देण्याचा अध्यादेश काढला. त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे तसेच अंतरवली सराटीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आरक्षण आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत सरकारने मराठा समाजास दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी. राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. त्यांना समर्थन देण्यासाठी सकल मराठा समाजाकडून बुधवार दिनांक १४ रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदला मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज पिंपरी




चिंचवड शहराच्या वतीने पाठिंबा दिला आहे. तसेच बुधवारी शहर बंद ठेवून शांततेत पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बुधवार दिनांक १४ रोजी सकल मराठा समाज पिंपरी चिंचवड शहर व मावळ तालुक्याच्या वतीने भव्य दुचाकी व चार चाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर रॅलीची सुरवात बुधवारी सकाळी नऊ वाजता डांगे चौक थेरगाव येथील छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात येणार आहे. सदर रॅली तेथून पुढे काळेवाडी फाटा, जगताप डेअरी, रहाटणी, पिंपरीगाव मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे जाणार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सदर रॅली चिंचवड स्टेशन, आकुर्डी, भक्ती शक्ती समूह शिल्प निगडी कडे जाणार आहे. सदर रॅली तळेगाव मार्गे वडगाव कडे रवाना होणार आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक वडगाव मावळ येथे रॅलीचा समारोप होणार आहे. सदर रॅलीचे नियोजन सतिश काळे, सचिन बारणे, प्रकाश जाधव, भाऊ ढोरे, वैभव जाधव, नरेंद्र मुर्हे, अमोल ढोरे, नकुल भोईर, रावसाहेब गंगाधरे, विशाल मुर्हे, गणेश देवराम, संतोष शिंदे, सागर चिंचवडे, अरुण पवार, लहू लांडगे, शिवाजी पाडुळे, पोपट काळभोर, मारुती भापकर, सुनिता शिंदे, सचिन काळभोर आदी कार्यकर्ते करत आहेत.

# चिखलीत भव्य टाळ स्मारक उभारण्याची ग्रामस्थांची मागणी

## टाळ स्मारकामुळे चिखलीची खरी ओळख उलघडणार

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठगमन झाले. त्यावेळी त्यांचे टाळ चिखली येथे पडले होते'' त्यामुळे गावाला टाळगाव चिखली असे नाव पडले आहे. मात्र त्या टाळांची निशाणी किंवा ओळख म्हणून चिखलीत भव्य-दिव्य स्मारक उभारावे अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने महापालिका प्रशासनाकडे करण्यात आली आहे. गावाची ओळख वास्तू, स्मारक, कमान या मुळे केली जाते. त्यानुसार टाळगांव चिखली हे नाव पडण्याचा इतिहास जपला जावा, त्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण असेल असे गावकऱ्यांचे म्हणने आहे.



**''जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठगमन झाले. त्यावेळी त्यांचे टाळ चिखलीत पडले. त्या घटनेचे साक्षीदार असलेले महराजांच्या १४ टाळकऱ्यांपैकीचे एक टाळकरी चिखली गावांतील आहेत. टाळांची माहिती आणि गावाची ओळख व्हावी यासाठी टाळांचे स्मारक उभारण्यात यावे. यासाठीची मागणी महापालिका प्रशासनाकडे करण्यात आली आहे.**
**-विकास साने, सामाजिक कार्यकर्ते**



**इंद्रायणी नदीकाठी वसलेल्या गावाला चोहोबाजूने तटबंदी होती. ग्वाल्हेरचे देवराम कृष्णराव जाधवराव यांची गढी आहे. त्यामुळे गावाला धार्मिक, ऐतिहासिक आणि वारकरी संप्रदायाचा वारसा लाभला आहे. तसेच, गावातील श्री. भैरवनाथ हे जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीमध्ये परिचित आहे. -डॉ.ज्ञानेश्वर गाडगे**



**चिखलीला टाळांचे महत्त्व खूप आहे. चिखलीची ओळख त्यामुळे आहे. कमान केल्यामुळे ओळख झालीच पण टाळांचे महत्त्व पटवून देण्यासाठी स्मारक उभारण्यात यावे अशी आमची इच्छा आहे. -ह.भ.प रोहिदास मोरे (टाळगाव चिखली प्रसारित दिंडी अध्यक्ष)**

# आशाजींच्या नावाचा पुरस्कार मिळणे हे माझे भाग्यच : शान

## आशाताईंच्या नावाचा पुरस्कार मला मिळेल असे कधीही वाटले नव्हते

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** जगविख्यात गायिका आशा भोसले यांच्या नावाने मिळणारा पुरस्कार हा माझ्यासाठी खूप मोठा आहे. आशाताईंच्या नावाचा पुरस्कार मला मिळेल असे कधीही वाटले नव्हते, सर्व सन्मान एकीकडे आणि हा पुरस्कार एकीकडे एवढे या पुरस्काराचे माझ्यासाठी महत्व आहे. अशी भावना प्रसिद्ध पार्श्वगायक आणि संगीतकार शान उर्फ शांतनू मुखर्जी यांनी व्यक्त केली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान, सिध्दीविनायक ग्रुप पुरस्कृत २०वा 'आशा




भोसले पुरस्कार २०२४' प्रसिद्ध पार्श्वगायक शान (शांतनू मुखर्जी) यांना ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रदान करण्यात आला. एक लाख अकरा हजार रुपये, शाल व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी भाऊसाहेब भोईर (अध्यक्ष,अ. भा. मराठी नाट्य परिषद पि. चिं शाखा), कृष्णकुमार गोयल (उपाध्यक्ष, अ. भा. मराठी नाट्य परिषद पि. चिं शाखा) तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित उपस्थित होते. शान म्हणाले, माझ्या वयाच्या १४व्या वर्षी वडील गेले मात्र माझ्या वडिलांच्या पुण्याईमुळेच मी आज तुमच्यापुढे उभा आहे. पं.हृदयनाथ मंगेशकर म्हणाले की, शान आणि माझी ओळख नव्हती, त्यांची गाणीही मी फारशी ऐकलेली नाहीत पण त्यांचे वडील मानस मुखर्जी आमचे जवळचे मित्र होते. लता आणि आशा भोसले त्यांच्या चाहत्या होत्या. मानस यांनी खूप कष्ट घेतले पण त्यांना अपयशाचा सामना करावा लागला. त्यांच्याच कष्टाची पुण्याई आज शान यांच्या कामी आली आहे. ज्या प्रमाणे आमच्या वडिलांची पुण्याई आम्हा भावंडाच्या उपयोगी आली तशीच शान यांच्याबाबतीतही घडले. प्रास्ताविकात भाऊसाहेब भोईर म्हणाले की, भारताची नव्हे तर जगाची शान असणारे पार्श्वगायक शान यांना हा पुरस्कार प्रदान केल्यामुळे आता पिंपरी चिंचवड शहराची शान आणखी वाढली आहे. मला नेहमी प्रश्न पडायचा मोठी माणसं मोठी का होतात? कारण ही माणसं आधी माणूस म्हणून मोठी असतात. जमीनीवर असतात. शान यांचाही साधेपणाही मला भावला, यामुळेच ही माणंस जगविख्यात होतात. मी शान यांना शब्द दिला होता की कार्यक्रमाला कितीही उशीर झाला तरी आपला कार्यक्रम हा होणार कारण, तुम्ही सरस्वतीचे तर मी नटराजाचा भक्त आहे. ही भूमी मोरया गोसावींची आहे. याच भूमीत आपण शंभर वर्षात झालं नाही असं दिमाखदार शंभरावे नाट्यसमेंलन पार पाडलं. पं. हृदयनाथ मंगेशकरांनी तर मला आपल्या कुटुंबात स्थान दिलंय. कार्यक्रमाच्या निमंत्रणासाठी जेव्हा त्यांच्या मी घरी गेलो. त्यांची अवस्था पाहून मला भरुन आलं.

# ग्रामपंचायती तुपाशी, जिल्हा परिषदा उपाशी

## 'प्रशासकराज'मुळे जिल्हा परिषदांचा वित्त आयोगाचा निधी बंद




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचा पंधराव्या वित्त आयोगाचा निधी केंद्र सरकारने मागील तीन वर्षांपासून बंद केला आहे. प्रशासकराज असलेल्या पंचायतराज संस्थांना वित्त आयोगाचा निधी दिली जाणार नसल्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे. केंद्राच्या या भूमिकेमुळे राज्यातील २५ जिल्हा परिषदा आणि २८४ पंचायत समित्यांना या निधीपासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे मिळून सुमारे २२ हजार कोटी रुपयांच्या निधीचे नुकसान झाले आहे. यामुळे ग्रामपंचायतींना मात्र पूर्वीप्रमाणे हा निधी दिला जात आहे. या निधीच्या बाबतीत ग्रामपंचायती तुपाशी, तर, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या उपाशी असे चित्र पहावयास मिळू लागले आहे. या वृत्ताला ग्रामविकास खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. मात्र याबाबत अधिकृतपणे बोलण्यास त्यांनी नकार दिला आहे. देशातील पंचायतराज संस्थांना आपापल्या कार्यक्षेत्रातील विविध विकासकामे करण्यासाठी केंद्रीय वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून दिला जातो. देशात सध्या त्रिस्तरीय पंचायतराज पद्धती कार्यरत असून, यामध्ये जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद, तालुका पातळीवरील पंचायत समिती आणि गाव पातळीवरील ग्रामपंचायत आदी तीन संस्थांचा समावेश आहे. केंद्रीय वित्त आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या एकूण निधीपैकी ७० टक्के निधी ग्रामपंचायती, २० टक्के निधी पंचायत समित्या आणि १० टक्के निधी हा जिल्हा परिषदांना दिला जातो. मात्र पदाधिकारी कार्यरत नसलेल्या पंचायतराज संस्थांना हा निधी न देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यामुळे प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना गेल्या तीन वर्षांपासून कवडीचाही निधी मिळू शकलेला नसल्याचे पुणे जिल्हा परिषदेतून सांगण्यात आले.केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे प्रशासकराज असलेल्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमार्फत गाव पातळीवर केल्या जाणाऱ्या विविध विकासकामांना मोठी खीळ बसली आहे. सद्य:स्थितीत पुणे जिल्हा परिषदेसह राज्यातील २५ जिल्हा परिषदा व जिल्ह्यातील तेरा पंचायत समित्यांसह २८२ पंचायत समित्यांवर प्रशासकराज आहे. पंचायत समित्यांवर १३ मार्च २०२२ तर, जिल्हा परिषदांवर २० मार्च २०२२ पासून प्रशासकराज कार्यरत आहे. केंद्रीय वित्त आयोगाची दर पाच वर्षांनी पुनर्रचना केली जाते. यानुसार १ एप्रिल २०२० पासून देशात पंधरावा वित्त आयोग चालू आहे. या आयोगाची ३१ मार्च २०२५ रोजी मुदत संपणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारने सोळाव्या वित्त आयोगाच्या अध्यक्षांच्या निवडीची घोषणाही केली आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना गेल्या तीन वर्षात पंधराव्या वित्त आयोगाचा एकूण ६४७ कोटी ८१ लाख ४८ हजार ८४४ रुपयांचा निधी मिळाला आहे. यापैकी पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यावर निम्मा निधी खर्च करण्याचे बंधन ग्रामपंचायतींवर घालण्यात आलेले आहे.

> **“ मुळात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवर प्रशासकराज येण्यासाठी सरकार जबाबदार आहे. त्रेहत्तराव्या घटनादुरूस्तीतील तरतुदीनुसार कमाल सहा महिन्यात या संस्थांची पंचवार्षिक निवडणूक घेणे सरकारवर बंधनकारक आहे. तरीही सरकारने ही तरतूद झुगारून दोन वर्षांपासून या संस्थांवर प्रशासकराज लादले आहे. त्यातच आता या संस्थांना १५ व्या वित्त आयोगाच्या निधीपासून वंचित ठेवले जात आहे. यामुळे गाव पातळीवरील विकासकामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने सर्व जिल्हा परिषदांना वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.**
>
> **- वीरधवल जगदाळे,**
> **माजी जिल्हा परिषद सदस्य, पुणे.**

# स्वारगेट ट्रान्सपोर्ट हबची जागा कायमस्वरूपी मेट्रोला

## ३ हजार ९४१ चौरस फुटाचा भूखंड १० वर्षासाठी भाड्याने देण्याचा निर्णय



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वारगेट येथील तब्बल १३ हजार ९४१ चौरस फुटाचा भूखंड पुणे महामेट्रोला १० वर्षासाठी भाड्याने देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता हा निर्णय रद्द करण्यात आला असून, ३८ कोटी ५४ लाख ५७ हजार रुपयांच्या बदल्यात ही जागा आता कायम स्वरुपी महामेट्रोला देण्याचा निर्णय स्थायी समितीच्या बैठकीत गुपचूप घेण्यात आला आहे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न तर बुडाले आहेच, पण मोक्याचा भूखंड देखील महापालिकेच्या हातातून गेला आहे. पुणे शहरात मेट्रोचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. सध्या वनाज ते रामवाडी आणि स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड या दोन मार्गांचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्वारगेट ते पिंपरी चिंचवड या मार्गासाठी स्वारगेट येथील जेधे चौकात भूमिगत मेट्रोस्टेशन तयार करण्यात आले आहे. पुढील काही महिन्यात हे स्टेशन सुरु होणार आहे. दरम्यान, महामेट्रोकडून स्वारगेट येथे मेट्रोचे भूमीगत स्थानक उभारले जात असतानाच या ठिकाणी पीएमपी, एसटी स्थानक यांचा समावेश करून ट्रान्सपोर्ट हब उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये व्यावसायिक गाळ्यांचाही समावेश आहे. स्वारगेट चौकातील ही जागा पाणी पुरवठा विभागाची आहे, पण मेट्रोला ही जागा देताना पर्वती टीपी स्कीम ३ मधील फायनल प्लॉट क्रमांक ४९९ व ५०० अ मधील सुमारे १३ हजार ९४१,९४ चौरसमीटर जागा भाडेकराराने देण्याचा निर्णय २०२१ मध्ये घेण्यात आला.महापालिकेच्या जागा वाटप नियमावलीनुसार, भाडे घेण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी स्थापन केलेल्या समितीने १७ जानेवारी २०२३ रोजी रेडीरेकनर दराच्या १२ टक्के वार्षिक भाडे या निश्चित केले. ही जागा १० वर्ष भाड्याने दिली जाणार असल्याने रेडिरेकनरचा दर वाढल्यानंतर भाड्यातही वाढ होणार होती. त्यामुळे महापालिकेला दरवर्षी ५ कोटी पेक्षा जास्त उत्पन्न मिळणे शक्य होते.

# सार्वजनिक स्वच्छतागृहांचेही आता खासगीकरण?

## शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महापालिकेची असताना आता शहराच्या विविध भागांत चार ठिकाणी खासगी ठेकेदाराच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी होणार आहे. त्या बदल्यात महापालिका या ठेकेदाराला जाहिरातफलक लावण्याची परवानगी देणार आहे. त्यासाठी मोक्याच्या जागा कंपनीला दहा वर्षांसाठी दिल्या जाणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छतागृहातही खासगीकरणाची पद्धत सुरू होणार आहे.शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था दयनीय आहे. त्यातच पुरुषांच्या तुलनेत महिलांसाठीच्या स्वच्छतागृहांचे प्रमाण अत्यल्प आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था, सुरक्षेचा मुद्दा कायम चर्चेत राहिला आहे. महापालिकेला निकषानुसार महिला आणि पुरुषांसाठी स्वच्छतागृहे उभारणे अडचणीचे ठरत असल्याची वस्तुस्थिती आहे. मात्र त्यामुळे आता ठेकेदारांच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी करण्याचे नियोजित असून, तसा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीपुढे ठेवला आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहांती देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेला दर वर्षी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्यामुळे टिंगेरनगर रस्त्यावरील जुना विमानतळ रस्ता, विश्रांतवाडी चौक, नगर रस्त्यावरील चंदननगर आणि खराडी गाव येथे नेटवर्क मीडिया सोल्युशन या कंपनीच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येणार आहे. त्या बदल्यात या कंपनीला फर्ग्युसन रस्ता, कोरेगाव पार्क, कल्याणीनगर येथील दोन ठिकाणी जाहिरातफलक लावण्याची परवानगी देण्यात आली आहे. एक जाहिरातफलक ९०० चौरस फुटांप्रमाणे तीन हजार ६०० चौरस फूट जागेवर जाहिरातफलक लावण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागाच्या अटी शर्तीनुसार जाहिरातशुल्क आकारणी आणि वसुली कंपनीला करता येणार असल्याचे या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. कंपनीला ही जागा १० वर्षांसाठी देण्यात येणार असून, पहिल्या वर्षी महापालिकेला एक लाख २० हजार रुपये उत्पन्न मिळेल. त्यानंतर पुढील प्रत्येक तीन वर्षांनी उत्पन्नात पाच टक्क्यांनी वाढ केली जाणार आहे. त्यानुसार दहाव्या वर्षी महापालिकेला १ लाख ३८ हजार रुपये मिळणार असल्याचे प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.



### ठेकेदारांच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी

» महापालिकेला निकषानुसार महिला आणि पुरुषांसाठी स्वच्छतागृहे उभारणे अडचणीचे ठरत असल्याची वस्तुस्थिती आहे. मात्र त्यामुळे आता ठेकेदारांच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी करण्याचे नियोजित असून, तसा प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समितीपुढे ठेवला आहे. महापालिकेला दर वर्षी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्यामुळे टिंगेरनगर रस्त्यावरील जुना विमानतळ रस्ता, विश्रांतवाडी चौक, नगर रस्त्यावरील चंदननगर आणि खराडी गाव येथे नेटवर्क मीडिया सोल्युशन या कंपनीच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येणार आहे.

# शालेय पोषण आहार आता होणार अधिक पोषक

## पोषण आहारातील खिचडी अधिक पोषक होणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पोषण आहारातील खिचडी रोज खाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पोषण आहार आता अधिक पोषक होणार आहे. विद्यार्थ्यांना आठवड्यातून किमान एक दिवस फळे, सोया बिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे अशा स्वरुपात पूरक आहार देण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले.राज्यात सद्यः स्थितीत योजनेसाठी पात्र असलेल्या सर्व शाळांमधून प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत तांदळापासून बनवलेल्या पाककृतीच्या स्वरुपात नियमित आहाराचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतो. तसेच अलीकडेच घेतलेल्या निर्णयानुसार आठवड्यातून एक दिवस विद्यार्थ्यांना अंडी, केळी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आता शालेय पोषण आहारात अधिक पूरक घटक समाविष्ट करण्यात येणार आहेत.गोसावी यांनी जिल्हा परिषदांचे प्राथमिकचे शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबईच्या शिक्षणाधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे त्याबाबतचे निर्देश दिले. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात द्राक्ष उत्पादन होत आहे. राज्यातील काही शाळा विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस पूरक आहारामध्ये बेदाण्याचा लाभ देत आहेत. त्यानुसार या योजनेंतर्गत आता नियमित आहारासोबत आठवड्यातून एक दिवस पूरक आहार म्हणून फळे, सोया बिस्कीट, दूध, चिक्की, राजगिरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे अशा स्वरुपात पूरक आहार देण्याबाबत पुन्हा एकदा सर्व शाळा आणि केंद्रीय स्वयंपाकगृह संस्थांना सूचना देण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. पोषण आहारातील खिचडी रोज खाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पोषण आहार आता अधिक पोषक होणार आहे. विद्यार्थ्यांना आठवड्यातून किमान एक दिवस फळे, सोया बिस्कीट, दूध, चिक्की, राजगिरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे अशा स्वरुपात पूरक आहार देण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले.

